मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# आमदार महेश लांडगे यांचा पंढरपुरात गौरव!

## ‘क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ जाहीर; १८ ऑक्टोबरला सन्मान!

» पिंपरी | प्रतिनिधी

**हिंदुत्वाच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका, गोरक्षणासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांचा जागर करण्यासाठी पुढाकार घेणारे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांना यंदाचा प्रतिष्ठेचा ‘क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ जाहीर झाला आहे. हिंदुत्वाशी संबंधित विविध प्रश्नांवर सार्वजनिक जीवनात आणि महाराष्ट्राच्या विधानसभेत त्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेची दखल घेत या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. पंढरपूरच्या पवित्र भूमीत होणारा हा सन्मान आमदार लांडगे यांच्या हिंदुत्वविषयक कार्याची महत्त्वपूर्ण दखल मानला जात आहे.**



रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिराशेजारी असलेल्या क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या पुतळ्याजवळ पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. चंद्रशेखर महाराज देगलूरकर आणि उपस्थित साधुसंतांच्या शुभहस्ते आमदार महेश लांडगे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मानाचे महावस्त्र, कुंडलिनी-कृपाणांकित भगवा ध्वज आणि ११ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. आमदार महेश लांडगे यांनी गोरक्षण आणि हिंदुत्वाशी संबंधित प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला आहे. सार्वजनिक व्यासपीठांसह विधानसभेतही त्यांनी या विषयांवर आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. विशेषतः धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम, त्यांचा त्याग आणि हिंदवी स्वराज्यासाठीचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या त्यांच्या प्रयत्नांचा पुरस्कार निवडीत विचार करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक साकारण्यासाठी आमदार लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. या स्मारकाच्या माध्यमातून धर्मवीर संभाजी महाराजांचा प्रेरणादायी इतिहास समाजासमोर आणण्याचा त्यांचा संकल्प आहे. तसेच, स्मारकाच्या गौरवार्थ आयोजित करण्यात आलेल्या विश्वविक्रमी ढोल-ताशा मानवंदना सोहळ्यात ४ हजार ११२ वादकांनी एकाच वेळी ढोल-ताशांचे वादन करून ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला. या सोहळ्याच्या आयोजनाचाही पुरस्कार निवडीसाठी विशेष उल्लेख करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्वातंत्र्यसैनिक क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त हिंदुत्वविषयक कार्यात योगदान देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार प्रदान केला जातो. आयोजकांच्या माहितीनुसार, क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासह गोवामुक्ती आणि मराठवाडा मुक्तिसंग्रामात महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, चित्रपट निर्माते भालजी पेंढारकर, संगीतकार सुधीर फडके आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा त्यांना सहवास लाभला होता. पंढरपूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि तालीम क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. तसेच, १९५६ मध्ये आलेल्या महापुराच्या काळात केलेल्या बचावकार्यामुळे त्यांचे योगदान आजही स्मरणात आहे.

क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने स्मारक मंडळाच्या वतीने या पुरस्काराचे वितरण केले जाते. यापूर्वी मिलिंद एकबोटे, शिवशंकर स्वामी, धनंजय देसाई, अभय वर्तक, संजीव पुनाळेकर, प्रमोद मुतालिक आणि प्रसिद्ध कन्नड साहित्यिक एस. एल. भैरप्पा यांच्यासह विविध मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. आता या पुरस्काराच्या मानकऱ्यांमध्ये आमदार महेश लांडगे यांचाही समावेश होणार आहे.

पंढरपूर येथे होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यास हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन क्रांतिवीर वसंतदादा बडवे स्मारक मंडळाचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी-इचगावकर, पत्रकार व माजी नगरसेवक महेश खिस्ते, विवेक बेणारे आणि शहर हिंदू महासभेचे अध्यक्ष विकास मोरे यांनी केले आहे.

> “क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या नावाने दिला जाणारा ‘हिंदुत्व शौर्य पुरस्कार’ घोषित होणे, हा माझ्यासाठी अभिमानाचा आणि जबाबदारी वाढविणारा क्षण आहे. राष्ट्रसेवा, समाजसेवा आणि हिंदुत्वनिष्ठेचा त्यांचा वारसा प्रेरणादायी आहे. हा सन्मान माझ्यासोबत कार्य करणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्याचा आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांचा आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन गोरक्षण, संस्कृतीचे जतन आणि जनसेवेसाठी अधिक निर्धाराने कार्य करत राहीन. या सन्मानासाठी स्मारक मंडळाचे मनःपूर्वक आभार!”
>
> **-महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# शिल्पा गवारे प्रकरणात आरोपींवर कठोर कारवाई होणार!

» पिंपरी | प्रतिनिधी

**शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरणाची राष्ट्रीय महिला आयोगाने गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणातील आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा ठाम विश्वास आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला. रहाटकर यांनी मंगळवारी (दि. १३) कलाटे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप उपस्थित होते.**





शिल्पा गवारे प्रकरणातील आरोपींना अद्याप जामीन मंजूर झालेला नसल्याची माहिती देताना रहाटकर यांनी दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले. तसेच या प्रकरणाचा तपास पुढे नेऊन लवकरच दोषारोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, राज्यात हुंडाबळीच्या वाढत्या घटनांबाबत रहाटकर यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथांविरोधात जनजागृती सुरू असतानाही अशा घटना घडत असल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला. हुंड्यामुळे महिलांचे आयुष्य धोक्यात येत असेल, तर समाजाची वाटचाल नेमकी कोणत्या दिशेने सुरू आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

महिलांवरील अन्याय आणि हुंडाबळीच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाईची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

# देवदर्शनाहून परतताना काळाचा घाला; भाऊ-बहिणीचा मृत्यू!

## भोसरीतील मुल्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर; जुन्या दुचाकीला धडक

**पिंपरी | प्रतिनिधी**

**देवदर्शन करून घरी परतणाऱ्या सख्ख्या भाऊ-बहिणीवर काळाने घाला घातला. जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर भरधाव दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघांचाही मृत्यू झाला. हॉटेल पुना गेटसमोर रविवारी (दि. ११) रात्री नऊच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे भोसरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.**




एका खासगी महाविद्यालयात द्वितीय वर्षात शिक्षण घेत होता, तर ऋषिता अकरावीत शिकत होती. दोघेही शिक्षण घेत असताना कुटुंबाच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याची स्वप्ने पाहत होते. मात्र, देवदर्शन करून घरी परतताना झालेल्या भीषण अपघातात दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाल्याने मुल्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. ११) कौशिक आणि ऋषिता हे दोघे घोरवडेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेले होते. देवदर्शन आटोपल्यानंतर रात्रीच्या सुमारास ते दुचाकीवरून भोसरी येथील आपल्या घरी परतत होते. रात्री नऊच्या सुमारास त्यांची दुचाकी जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर हॉटेल पुना गेटसमोर आली असता, पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या दुसऱ्या दुचाकीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, कौशिक आणि ऋषिता दोघेही रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले. अचानक घडलेल्या या अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

अपघाताची माहिती मिळताच जखमी भावंडांना तातडीने उपचारासाठी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी दोघांवरही उपचार सुरू केले; मात्र कौशिकची प्रकृती गंभीर असल्याने उपचारादरम्यान रविवारी रात्री उशिरा त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर मृत्यूशी झुंज देणाऱ्या ऋषिताचीही सोमवारी (दि. १२) उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली. एकाच अपघातात तरुण मुलगा आणि अल्पवयीन मुलगी अशा दोन्ही भावंडांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भोसरी परिसरातील नागरिकांकडूनही या घटनेबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अपघातानंतर धडक देणाऱ्या दुचाकीचा चालक घटनास्थळावरून निघून गेल्याने त्याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. देहूरोड पोलिसांनी अपघातास कारणीभूत ठरलेली दुचाकी (एमएच १४ एनसी ०९७४) जप्त केली आहे. संबंधित दुचाकीस्वार अपघातात जखमी झाला असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी परिसरातील विविध रुग्णालयांमध्ये चौकशी करण्यात येत आहे. तसेच अपघात नेमका कसा घडला, धडक देणाऱ्या दुचाकीचा वेग किती होता आणि चालकाची भूमिका काय होती, याचा तपास केला जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास देहूरोड पोलीस करीत असून, संबंधित चालकाचा शोध घेऊन त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत.

# रक्तदान, रांगोळी अन् रस्सीखेच; महापालिकेचा वर्धापन दिन उत्साहात

**पिंपरी | प्रतिनिधी**

**रक्तदान शिबिर, आकर्षक रांगोळी, विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि रस्सीखेच स्पर्धेच्या उत्साहात पिंपरी-चिंचवड महापालिकेचा ४४ वा वर्धापन दिन सोमवारी (दि. १२) साजरा करण्यात आला. पिंपरी येथील महापालिका भवनात आयोजित या कार्यक्रमात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध क्रीडा व मनोरंजनात्मक स्पर्धांमुळे महापालिका भवन परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात स्पर्धांतील विजेत्यांसह गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सन्मान करण्यात आला.**





महापालिकेचा वर्धापन दिन ११ ऑक्टोबर रोजी असतो. मात्र, यंदा रविवारची साप्ताहिक सुटी असल्याने सोमवारी वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिका भवनाला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच, भवनाच्या तळमजल्यावर फुलझाडांच्या कुंड्या आणि फुलांच्या पाकळ्यांचा वापर करून भव्य व आकर्षक रांगोळी साकारण्यात आली होती. या सजावटीमुळे महापालिका भवनाच्या परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते.

वर्धापन दिनानिमित्त महापालिका भवनाच्या आवारातील कै. अण्णासाहेब मगर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास तसेच प्रतिमेस महापौर रवी लांडगे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, सहआयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मनोज सेठिया, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापू गायकवाड यांच्यासह विविध विभागांचे उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सामाजिक कार्यात योगदान दिले. यासोबतच अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विविध क्रीडा आणि मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमातील रस्सीखेच स्पर्धा विशेष आकर्षण ठरली. या स्पर्धेत महापौर रवी लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही सहभाग घेतला. वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र येत स्पर्धेचा आनंद घेतल्याने कार्यक्रमात उत्साह अधिकच वाढला. महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित पैठणीच्या खेळालाही चांगला प्रतिसाद मिळाला. विविध खेळ आणि मनोरंजनात्मक स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. वर्धापन दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामकाजातून विरंगुळा मिळाला. तसेच, परस्परांमधील संवाद, सहकार्य आणि सांघिक भावना वाढीस लागण्यास मदत झाली. स्पर्धांतील विजेते आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत कर्मचाऱ्यांचा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित कार्यक्रमात गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# दिव्यांगांच्या मागण्यांवर कार्यवाहीचे महेश लांडगेंचे आश्वासन!

## घरपट्टी सवलत, दोन लाखांचे अनुदान, स्वयंरोजगारासह विविध मागण्यांचे निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

**शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन आमदार महेश लांडगे यांनी दिले. प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने दिव्यांगांच्या आर्थिक सहाय्यापासून घरपट्टी सवलत, स्वयंरोजगार आणि सार्वजनिक ठिकाणी आवश्यक सुविधांपर्यंत विविध मागण्यांचे निवेदन त्यांना देण्यात आले. दिव्यांगांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी महापालिका स्तरावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.**



आमदार महेशदादा लांडगे स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे नवरात्रोत्सव उत्साहात सुरू आहे. देवीच्या दर्शनासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. या निमित्ताने नागरिकांना आपल्या समस्या आणि मागण्या थेट आमदार महेश लांडगे यांच्यासमोर मांडण्याची संधी मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या प्रतिनिधींनी दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांकडे आमदारांचे लक्ष वेधले.

स्वतःच्या मालकीच्या घरात राहणाऱ्या पात्र दिव्यांग व्यक्तींना घरदुरुस्ती आणि आवश्यक सुधारणा करण्यासाठी एकरकमी दोन लाख रुपयांचे अनुदान द्यावे, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. तसेच, घरपट्टीमध्ये ५० टक्के सवलतीचा लाभ मिळवताना इंडेक्स-२ उपलब्ध नसलेल्या दिव्यांगांना पर्यायी मालकी कागदपत्रांच्या आधारे सवलत द्यावी. मालमत्ता नोंदीमध्ये 'भोगवटादार' म्हणून नोंद असलेल्या पात्र दिव्यांग व्यक्तींनाही या सवलतीचा लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

सन २०१७ मध्ये साधनसामग्री खरेदीसाठी दहा हजार रुपयांचे अनुदान मिळालेल्या पात्र दिव्यांग व्यक्तींनाही सध्याच्या नियमानुसार एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य द्यावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पूर्वी मिळालेली साधनसामग्री कालांतराने खराब झाली असून, ती वापरण्यायोग्य राहिलेली नाही. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांच्या सध्याच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना पुन्हा आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

दिव्यांग व्यक्तीने दुसऱ्या दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास संबंधित दाम्पत्याला मिळणाऱ्या दोन लाख रुपयांच्या अर्थसहाय्य योजनेचा लाभ १ एप्रिल २०१३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. दिव्यांग-अव्यंग विवाहासाठी असलेल्या अर्थसहाय्य योजनेच्या धर्तीवर दोन्ही योजनांमध्ये समानता राखून पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा, असे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

दिव्यांग व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. सन २०१२ पूर्वी परवाना मिळालेल्या दिव्यांग स्टॉलधारकांना त्याच ठिकाणी व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात निवेदनात नमूद केलेल्या आदेशांची महापालिका स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करून दिव्यांगांच्या रोजगारावर परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही सांगण्यात आले.

महापालिकेची उद्याने, बागा आणि मनोरंजन केंद्रांमध्ये दिव्यांग व्यक्तींना सहज प्रवेश करता यावा आणि त्यांना या सुविधांचा स्वतंत्रपणे वापर करता यावा, यासाठी आवश्यक व्यवस्था निर्माण करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी रॅम्प, सुगम मार्ग आणि दिव्यांगांसाठी अनुकूल स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी संघटनेने केली.

याशिवाय, महापालिकेच्या सर्व इमारतींचे सुगम्यता परीक्षण अर्थात 'ॲक्सेसिबिलिटी ऑडिट' करण्यात यावे. या परीक्षणातून समोर येणाऱ्या त्रुटी दूर करून आवश्यक ठिकाणी रॅम्प, लिफ्ट आणि इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये थकबाकीदारांच्या मालमत्ता सील होणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने मालमत्ताकराची थकबाकी वसूल करण्यासाठी आता कठोर पावले उचलण्याची तयारी केली आहे. कराचा भरणा न करणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करून जप्तीची कारवाई केली जाणार आहे. चालू आर्थिक वर्षात मालमत्ताकर वसुलीचे १ हजार ३०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी करसंकलन विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. पहिल्या टप्प्यात बिगरनिवासी आणि औद्योगिक मालमत्तांवर कारवाई करण्याचे नियोजन असून, मोठ्या थकबाकीदारांना प्राधान्य दिले जाणार आहे.**



महापालिकेच्या करसंकलन विभागाने मालमत्ताकराची बिले वितरित करूनही कर न भरलेल्या मालमत्ताधारकांची स्वतंत्र यादी तयार केली आहे. संबंधित मालमत्ताधारकांशी संपर्क साधून त्यांना कर भरण्याचे आवाहन केले जात आहे. तसेच, थकबाकी वसुलीसाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र वापराच्या मालमत्ता आणि मोकळ्या जागांसह अन्य थकबाकीदारांची माहिती संकलित करण्यात आली आहे.

थकबाकीदारांना यापूर्वीच नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र, त्यानंतरही कराचा भरणा न करणाऱ्यांविरोधात आता प्रत्यक्ष कारवाई केली जाणार आहे. यासाठी महापालिकेच्या १८ विभागीय करसंकलन कार्यालयांमार्फत स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. या पथकांकडून थकबाकीदारांच्या मालमत्तांची तपासणी करून नियमानुसार सील आणि जप्तीची कारवाई केली जाणार आहे. कारवाईदरम्यान आवश्यक बंदोबस्तासाठी एमएसएफ जवानांचीही मदत घेतली जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेकडे एकूण ७ लाख ६६ हजार मालमत्ताधारकांची नोंद आहे. त्यापैकी ५ लाख ९ हजार २०० मालमत्ताधारकांनी मालमत्ताकराचा भरणा केला आहे. मात्र, अद्याप २ लाख ५६ हजार ८०० मालमत्ताधारकांनी कर भरलेला नाही. त्यामुळे थकबाकी वसूल करण्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर उभे राहिले आहे.

चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहा महिन्यांत महापालिकेच्या तिजोरीत मालमत्ताकरापोटी ६१० कोटी ४४ लाख रुपये जमा झाले आहेत. उर्वरित उद्दिष्ट गाठण्यासाठी करसंकलन विभागाने थकबाकीदारांकडून वसुली करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. कराचा भरणा वेळेत न केल्यास संबंधित मालमत्ताधारकांना कठोर कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

मालमत्ताकराची मोठी रक्कम थकीत असलेल्या मालमत्ताधारकांवर पहिल्या टप्प्यात कारवाई केली जाणार आहे. त्यानंतर इतर थकबाकीदारांबाबतही नियमानुसार कार्यवाही केली जाईल. विभागीय करसंकलन कार्यालयांच्या पथकांना कारवाईसाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. मालमत्ताकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाने थकबाकीदारांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे.

# विकसकांना दणका; पाण्याची जबाबदारी तुमचीच!

## महापालिकेचा नियमित पुरवठा सुरू होईपर्यंत टँकर-बोअरवेलचा खर्च विकसकांवर!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांतील बांधकाम विकसकांना महापालिकेने मोठा दणका दिला आहे. या गावांमधील बांधकाम प्रकल्प आणि गृहनिर्माण सोसायट्यांना महापालिकेचा नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत रहिवाशांसाठी पाण्याची पर्यायी व्यवस्था करणे विकसकांना बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी सुधारित हमीपत्राचा नमुना महापालिका आयुक्तांनी मंजूर केला असून, बांधकाम परवानगीच्या प्रस्तावासोबत हे हमीपत्र सादर करावे लागणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विकसकांवर दंडात्मक कारवाई करण्यासह बांधकाम परवानगी निलंबित करण्याची कारवाईही केली जाऊ शकते.**



पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील रहिवाशांना नियमित पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अनेक गृहप्रकल्पांमध्ये रहिवाशांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, त्याचा आर्थिक भार रहिवाशांवर पडत आहे. यापूर्वीच्या हमीपत्रातील त्रुटींमुळे विकसकांची जबाबदारी निश्चित करताना अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने हमीपत्रात सुधारणा केल्या आहेत. शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी या निर्णयाची माहिती दिली.

नव्या अटींनुसार, महापालिकेचा नियमित पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत बांधकाम विकसकांना रहिवाशांसाठी पर्यायी पाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. यासाठी आवश्यकतेनुसार बोअरवेल खोदणे, टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे किंवा तात्पुरत्या पाण्याच्या टाक्या उभारणे, यांसारख्या उपाययोजना कराव्या लागतील. या व्यवस्थेची देखभाल करण्याची तसेच त्यासाठी येणारा संपूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारीही विकसकाचीच राहणार आहे. ही जबाबदारी किमान तीन वर्षे किंवा महापालिकेचा प्रत्यक्ष नियमित पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत लागू राहील. या दोन्हीपैकी जी बाब उशिरा पूर्ण होईल, तोपर्यंत विकसकाला पाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. त्यामुळे केवळ बांधकाम पूर्ण करून घरे रहिवाशांच्या ताब्यात दिल्यानंतर पाणीपुरवठ्याच्या जबाबदारीतून विकसकांना सहजपणे हात झटकता येणार नाही.

सुधारित हमीपत्रातील अटी केवळ बांधकाम परवानगीपुरत्या मर्यादित नसतील. बांधकाम परवानगी, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला आणि भोगवटा प्रमाणपत्र या विविध टप्प्यांवरही पाणीपुरवठ्याची हमी लागू राहणार आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर विकसकांना पाणीपुरवठ्याच्या जबाबदारीची पूर्तता करावी लागेल. याशिवाय, विक्रीखत, अलॉटमेंट लेटर आणि सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांमध्येही पाणीपुरवठ्याची सद्यःस्थिती स्पष्टपणे नमूद करावी लागणार आहे. महापालिकेचा नियमित पाणीपुरवठा सुरू आहे की नाही आणि पर्यायी पाणीव्यवस्थेची जबाबदारी कोणाची आहे, याची माहिती संबंधित कागदपत्रांत देणे आवश्यक असेल. यामुळे घर खरेदी करणाऱ्या नागरिकांना पाणीपुरवठ्याबाबतची वस्तुस्थिती आधीच समजण्यास मदत होणार आहे.

रहिवाशांना पर्यायी व्यवस्थेतून पुरवले जाणारे पाणी सुरक्षित असणेही आवश्यक आहे. त्यामुळे टँकर किंवा बोअरवेलमधून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी तपासून घेण्याची जबाबदारी विकसकांवर सोपविण्यात आली आहे. पाणी वापरण्यास योग्य असल्याची खात्री करूनच त्याचा पुरवठा करावा लागणार आहे. त्यामुळे पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच त्याच्या गुणवत्तेची काळजी घेणेही विकसकांना बंधनकारक असेल.

सुधारित हमीपत्रातील अटींचे उल्लंघन करणाऱ्या विकसकांवर महापालिका प्रशासनाकडून कठोर कारवाई केली जाऊ शकते. यामध्ये दंड आकारणे, बांधकाम परवानगी निलंबित करणे, नवीन परवानग्या रोखणे तसेच गंभीर प्रकरणांमध्ये फौजदारी कारवाई करण्याचाही समावेश आहे. संबंधित विकसकांना मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावांची यादी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करून ती वेळोवेळी अद्ययावत ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे पुणे महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील गृहप्रकल्पांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर विकसकांची जबाबदारी अधिक स्पष्ट होणार आहे. महापालिकेची नियमित पाणीपुरवठा यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी या सुधारित अटी महत्त्वपूर्ण ठरण्याची अपेक्षा आहे.

# पुणे आरटीओचे 'वाहन' पोर्टल पुन्हा ठप्प! लायसन्स परीक्षांनाही फटका

**» पुणे | प्रतिनिधी**

**प्रादेशिक परिवहन विभागाचे (आरटीओ) 'वाहन' पोर्टल पुन्हा तांत्रिक अडचणींच्या विळख्यात सापडले आहे. महिनाभर ठप्प राहिल्यानंतर अवघ्या १५ ते २० दिवसांपूर्वी सुरू झालेले पोर्टल पुन्हा व्यवस्थित काम करत नसल्याने वाहनधारकांसह वाहन व्यावसायिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. वाहन हस्तांतरणासाठी अर्ज भरताना हॉर्स पॉवर आणि व्हील बेस यांसारख्या महत्त्वाच्या माहितीचे रकाने रिकामे राहत आहेत. त्यामुळे अर्ज सबमिट होत नसून, वाहन हस्तांतरणासह परिवहन विभागातील अनेक कामांना ब्रेक लागला आहे.**




राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र अर्थात नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर (एनआयसी) मार्फत आरटीओला 'वाहन' पोर्टलसह परिवहनविषयक माहिती-तंत्रज्ञान सेवा आणि डिजिटल सुविधा पुरविल्या जातात. या प्रणालीमध्ये वेळोवेळी आवश्यक बदल आणि सुधारणा केल्या जातात. मात्र, अशा अपडेटच्या काळात पोर्टलचा वेग मंदावणे किंवा तांत्रिक अडचणी निर्माण होणे, हा वाहनधारकांसाठी वारंवारचा अनुभव ठरत आहे. आता पुन्हा पोर्टलमध्ये अडथळे येऊ लागल्याने नागरिकांना विविध कामांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

आरटीओमधील संबंधित कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दोन ते तीन दिवसांत पोर्टलमधील अडचणींबाबतच्या तक्रारी वाढल्या आहेत. वाहन हस्तांतरणाच्या अर्जात वाहनाची हॉर्स पॉवर आणि व्हील बेस यांची माहिती दिसत नसल्याने अर्ज पुढे पाठवता येत नाहीत. परिणामी, आवश्यक कागदपत्रे आणि इतर प्रक्रिया पूर्ण करूनही वाहनधारकांची कामे मार्गी लागत नाहीत. या तांत्रिक समस्येमुळे आरटीओ कार्यालयातील विविध सेवांवर परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

'वाहन' पोर्टलमधील अडथळ्यांचा फटका वाहनांच्या पासिंग प्रक्रियेलाही बसत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पासिंगच्या कामात अडचणी येत असल्याचे काही वाहन व्यावसायिक आणि एजंटांनी सांगितले. नव्या ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन (एटीएस) यंत्रणेवर वाहनांच्या चाचण्या करतानाही अनियमितता जाणवत असल्याचा दावा एका ज्येष्ठ एजंटने केला. या अडचणींमुळे काही वाहनधारकांनी अन्य शहरांतील केंद्रांवर वाहनांचे पासिंग करून घेण्यास पसंती दिल्याचेही त्यांनी सांगितले.